पोलीस अधीक्षक कार्यालय
गडचिरोली दिनांक २६/०१/२०१९

# वार्तापत्र

## ‘‘पोलीस मुख्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा’’

६९ वा. भारतीय प्रजासत्ताक दिन पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर आज मोठया उत्साहात साजरा करयात आला. यावेळी मा. ना. अम्ब्रीशराव आत्राम , आदिवासी विकास व वन राज्य मंत्री तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा यांच्या हस्ते ध्वजारोहण होवून कार्यक्रमास सुरवात झाली. यावेळी झालेल्या परेडचे नेतृत्व उपविभागीय पोलीस अधिकारी (अभियान) समीर सिंग साळवे यांनी केले. या परेड मध्ये विशेष अभियान पथकातील जवान, वनविभाग, होमगार्ड, विविध शाळा, महाविदयालयातील विध्यार्थी, विध्यार्थीनी यांनी सहभाग नोंदविला. सदर वेळी सरस्वती विदयालयाच्या विदयार्थींनी सादर केलेला ऐतिहासिक देखावा सर्वांचे लक्ष वेधणारा ठरला.

यानंतर झालेल्या सन्मान सोहळयात पोलीस दलातील विशेष व उत्तुंग कामगिरी मुळे केंद्र सरकारव्दारे नुकत्याच जाहीर झालेल्या पराक्रम पदक प्राप्त गडचिरोली पोलीस दलातील पोलीस कर्मचारी १) नापोशि/२७३६ राजु सिडाम २) नापोशि/३००६ महेश कुलेटी ३) पोशि/३६३० गणेश मोहुर्ले ४) पोशि/१२९६ विजय जालटे ५) नापोशि/८८३ किरण दर्गम ६) नापोशि/२७९३ रमेश गावडे अश्या सहा जवानांना मा. ना. अम्ब्रीशराव आत्राम , आदिवासी विकास व वन राज्य मंत्री तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा यांच्या हस्ते पराक्रम पदक व पुष्पगुच्छ देवुन गौरविण्यात आले. यावेळी मा. जिल्हाधिकारी श्री शेखरसिंह, पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे, अपर पोलीस अधिक्षक, श्री मोहित कुमार गर्ग हे उपस्थित होते.


IPS


IPS
मपो